# I need some water to sprout

In this dreary deadly summer,
I am alive because my hopes are
the hot heat waves are burning my leaves and flowers
but I am alive because I hope in future, there will be showers
A day will come when I will be the witness of baby sparrow's first chirp
by getting my sweet fruits, the little squirrel will burp
I will decorate myself with the long and beautiful tender vines
and will look gorgeous after having bird nest of serene design
The twigs of mine will make the shelter to the poor
travelers will take afternoon nap in my shadow for hours
despite all the adversities against my survival I believe in my dream
because my dreams are my life and my life is my dream

**Sagar Kabra**






८ मे २०१६ च्या दिवशी बिलासपूर (छत्तीसगढ) जवळ सागर-नेहा-पंकज या आपल्या मित्र मैत्रिणींचा दुर्दैवी अपघात झाला. या अपघाताने सागरला आपल्यातून नेले. नेहा व पंकज जखमी झाले. या कठीण प्रसंगानंतर दोघेही शारीरिक व मानसिकदृष्ट्या सावरण्याचा धैर्याने प्रयत्न करत आहेत.

मूळ मानवतचा (जि. परभणी) सागर यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून MBBS झाला. कॉलेजमध्ये शिकत असताना अभ्यासासोबत आपण समाजासाठी काय करू शकतो या शोधात त्याने मेळघाटच्या आदिवासी पाड्यांतील बालमृत्यू कमी करण्यासाठी धडक मोहीम गाठली. पुढे सलग सहा वर्षे त्याने धडक मोहिमांचे काम नेटाने केले. याचदरम्यान निर्माणच्या तिस-या बॅचमध्ये सागर आला. सागर-धीरज-पवन हे कॉलेजमधील घनिष्ठ मित्र निर्माणच्या शिबिरांतही उठून दिसत. ग्रामीण भागात आरोग्यसेवा पोचवण्याबद्दल त्यांची कळकळ, धडाडी यामुळे शिबिरात सकारात्मक वातावरण अगदी कायम राहात असे.

डॉक्टर झाल्यावर सागरने छत्तीसगडमधल्या गाणियारी येथील 'जन स्वास्थ्य सहयोग' या आदिवासी, दुर्गम भागातल्या दवाखान्यात आरोग्यसेवा देणं सुरू केलं. यादरम्यान अधिक चांगली आरोग्यसेवा देण्याची क्षमता मिळवण्यासाठी त्यानं उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. आपलं संपूर्ण आयुष्य ग्रामीण रूग्णसेवेसाठी द्यायचे सागरने ठरवले होते. ग्रामीण भागात जायला आधीच कमी डॉक्टर तयार होतात. ग्रामीण भागात लोक आपल्या भागात कोणत्या स्पेशलायझेशनचे डॉक्टर आहेत हे पाहून आजारी पडत नाहीत. जास्तीत जास्त लोकांना सेवा द्यायची तर शरीराच्या एखाद्या अवयवावर

स्पेशलायझेशन करून नाही चालणार. त्यामुळे सागरने 'जन स्वास्थ्य सहयोग' येथेच स्पेशलायझेशन इन जनरलायझेशन म्हणजे फॅमिली मेडिसीन या वलयांकित नसलेल्या शाखेत प्रवेश घेतला.

रूग्णांबद्दल अतिशय संवेदनशील असणारा सागर रूग्ण तपासणी करताना त्यांचे बोलणे समवेदनेने ऐकून घेई. हसतमुख, रूग्णाचे ऐकणारा आणि सक्षम डॉक्टर – अतिशय दुर्मिळ आणि रूग्णांना दिलासा देणारे combination! आरोग्यसेवेसंबंधी लोकांवर होणारा अन्याय त्याला अस्वस्थ करीत असे. सर्वांना आरोग्यसेवा मिळावी असे त्याचे स्वप्न होते. आपले अनुभव, अस्वस्थता, स्वप्ने त्याने अतिशय सुंदर शब्दांत मांडले आहेत. ते नक्की वाचा -

http://www.jssbilaspur.org/author/sagarkabra/

निर्माणच्या अनेक तरूण डॉक्टरांनी ग्रामीण भागात एक वर्ष आरोग्यसेवा देण्याचा निर्णय मागच्या महिन्यात घेतला. सीमोल्लंघनमध्ये ही बातमी वाचून सागरने १ मे ला त्यातल्या काही जणांना फोन केला. सागरला आधी कधीही न भेटलेल्या अमित ढगेला सागरचे कौतुकाचे शब्द ऐकून भरून आले. सागरने अमितच्या निर्णयाचे कौतुक केले, त्याच्यासोबत ग्रामीण भागात आरोग्यसेवा देताना आलेले अनुभव शेअर केले. Medico Friends Circle च्या धर्तीवर आपणही सामाजिकदृष्ट्या सक्रीय डॉक्टरांचा गट बनवू असे सागरने सुचवले. सागरने पेरलेले बी आपले डॉक्टर मित्र नक्कीच वाफवतील.

आज सागर आपल्यात नाही. पण आपल्या सर्वांच्यातच एक सागर आहे. सागरच्याच वरील कवितेप्रमाणे आपल्यातला सागर अंकुरण्यासाठी त्याला काळजीपूर्वक व प्रयत्नपूर्वक पाणी घालूया.



# सागर काबरा

*'मैत्री' स्वयंसेवी संस्थेच्या मेळघाटातील धडक मोहिमांविषयी त्यानं कॉलेजात शिकत असतानाच 'ऑक्सिजन' पुरवणीत वाचलं होतं. त्या माहितीनं प्रेरणा घेत तो सलग सहा वर्षे या धडक मोहिमांत सहभागी झाला. मित्रनाही त्यानं प्रेरणा दिली. आणि डॉक्टर झाल्यावरही छत्तीसगडमधल्या गानियारीमधल्या आदिवासी, दुर्गम भागातल्या दवाखान्यात सेवा देणं सुरू केलं. आपलं सारं आयुष्य ग्रामीण रुग्णसेवेसाठी द्यायचं ठरवलेल्या या 26 वर्षाच्या संवेदनशील दोस्ताचं अलीकडेच अपघाती निधन झालं.*

काही लोकांचं जगणं असं असत की ते जेव्हा असतात तेव्हा लोकांच्या जीवनात बहार आणतात आणि जेव्हा ते जातात तेव्हा अनेक प्रश्न मागे सोडून जातात. सागरचं जीवन पण असंच एक उदाहरण होतं. डॉ. सागर हनुमानदासजी काबरा, वय २६ वर्षे, रा. मानवत, जिल्हा परभणी. त्याचे आजोबा स्वतंत्रता सेनानी होते. घरात आई, वडील आणि दोन बहिणी. लहानपणापासूनच दुस:यांबद्दल संवेदनशील राहण्याचे संस्कार त्याला घरात लाभले. आणि त्याच्या दुस:यांना सतत मदत करण्याच्या स्वभावाला अनुसरून डॉक्टर व्हायचं त्यानं ठरवलं. भरपूर अभ्यास करून यवतमाळच्या श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशही मिळवला. कॉलेजमध्ये असताना अभ्यासासोबतच आपण समाजासाठी काय करू शकतो, याचा शोध त्याचं मन घेत राही.

मैत्री नामक एक स्वयंसेवी गट मेळघाटात धडक मोहिमा राबवते हे त्यानं 'ऑक्सिजन' पुरवणीत वाचलं होतं. त्या माहितीनं प्रेरणा घेत तो सलग सहा वर्षे या धडक मोहिमेत सहभागी होत होता. इतरांना मोहिमेत येण्यासाठी प्रोत्साहन देत होता. या पूर्ण काळात या पूर्ण गावांमध्ये 3 ते 4 बालमृत्यू आणि एक ही मातामृत्यू झाला नाही. सागर आणि त्याच्या मित्रसह 'मैत्री'साठी हे एक मोठं यश होते. या नंतरही त्यांचे हे काम चालू होते. सागरचं हे काम बघून त्याला 'निर्माण' या डॉ. अभय आणि राणी बंग यांनी सुरू केलेल्या उपक्रमात सामील होण्याची संधी मिळाली. निर्माणमुळे त्याला वैचारिक स्पष्टता आली आणि आपणही असंच काहीतरी करावं, असं त्याला वाटायला लागलं.

आपल्या समवयीन, युवामित्रांचा आपल्याच समाजाविषयी असलेला नैराश्यवाद बघून तो बऱ्याच वेळेस व्यथित व्हायचा. म्हणून मग त्यानं आणि त्याच्या मित्रांनी मिळून शिबिरं घ्यायला सुरुवात केली. या शिबिरांमधून स्वत:च्या शोधापासून तर समाजातील प्रश्नांबद्दल चर्चा व्हायला लागल्या. काहीतरी करून पाहू म्हणणारे कृतिशील मित्र त्याला भेटत गेले.

हे सर्व सुरू असतानाही अभ्यासाकडे व्यवस्थित लक्ष देत त्याने त्याची एमबीबीएसची डिग्री वेळेत पूर्ण केली. मात्र त्यानंतर पीजी, नंतर लग्न, स्वत:चा प्रायव्हेट दवाखाना आणि मग पैसा कमवणं या घोडेबाजारातील समीकरणात पडायचं नाही इथपर्यंतचा निर्णय त्यानं घेतला होता. पण हे नाही तर मग पुढे

नेमकं करायचं काय? या प्रश्नाचं उत्तर अजूनही त्याला स्पष्ट नव्हतं. आपल्या समाजात डोळे झाकून चाललेल्या विषमतेमुळे त्याची सारखी चीड चीड व्हायची. एकीकडे शहरात गल्ली बोळात दवाखाने, डॉक्टरांच्या भाषेत सॅच्युरेशन आणि दुसरीकडे निमोनिया, हगवणी सारख्या साध्या आजारांनी शेकडो बालमृत्यू व्हावेत, एकीकडे बाळंतपणात दुखू नाही म्हणून सिझर आणि दुसरीकडे आईला स्वत:च बाळाची नाळ दगडाने ठेचून तोडावी लागतेय. केवढी ही विषमता! पैसा नसल्याने रुग्णाचे होणारे हाल आणि अख्ख्या कुटुंबाची होणारी फरफट त्याच्या नजरेआड होईना. दुस:यांना भाषणं देऊन जग बदलणार नाही याची पुरती कल्पना एव्हाना त्याला आलेली होती. 'बी द चेंज यू वॉण्ट' हे वाक्य आता त्याच्या रक्तात धावायला लागलं होतं. आणि मग त्यानं सुरुवात स्वत: पासूनच करायचा निर्णय घेतला.

छत्तीसगढमधील, ग्रामीण आणि आदिवासी भागातील गानियारी येथील 'जनस्वास्थ्य सहयोग' या दवाखान्यात त्यानं सेवा देण्यास सुरुवात केली. सोबतच आजूबाजूच्या गावांत जाऊन लोकांशी बोलणं, त्यांना समजून घेणं, रोगांबद्दल माहिती देणं, उपचार आणि फावल्या वेळेत वाचन अशी सर्व त्याची कामाची पद्धत. रुग्णांप्रती असलेल्या संवेदनेने केवळ रुग्ण बरे होत नाहीत, त्यासाठी तांत्रिक ज्ञान आणि कौशल्यही शिकत राहावी लागतात, म्हणून त्यानं उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला.

सर्व दुनिया स्पेशलायझेशनकडे धावत असताना, माझ्या देशाच्या ग्रामीण, गरीब, माय-बापड्याची गरज स्पेशलायझेशन नसून, स्पेशलायझेशन इन जनरलायझेशन आहे. आज असं म्हणत पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी नॅशनल एण्ट्रन्स देऊन फॅमिली मेडिसीन या दुर्लक्षित शाखेत त्यानं त्याच ग्रामीण दवाखान्यात प्रवेश घेतला. तो कामात काहीही कसर सोडत नव्हता. बरे होणारे रुग्ण दुवा देत होते. आपल्या देशाची आरोग्यसेवा अगदी शेवटच्या माणसापर्यंत कशी पोहचवू, असे प्रश्न पडायला लागली होती. प्रश्न जसा पर्वतासारखा तशी स्वप्नेही पर्वतासारखीच पडायला लागली होती. कविता कागदांवर उतरायला लागल्या होत्या.

वर्षभर त्यानं तिथं काम केलं. आणि ८ मे २०१६ रोजी दवाखान्यातील एका नर्सचा विवाहसोहळा बिलासपूरला होणार होता. त्यासाठी तो गेला होता. तिथून मोटारसायकलने परतताना समोरून भरधाव येणाऱ्या कारनं सागर आणि त्याच्या मित्रांना उडवलं. अपघात एवढा भीषण होता की, मोटारसायकलचं फक्त इंजिनच सापडलं. सागरच्या उजव्या पायाची अर्धी हड्डी तुटून बाहेर पडली, डोक्याला मार आणि छातीच्या बरगडय़ाही मोडल्या. सोबतच्या मित्रांनाही गंभीर जखमा झाल्या. साधारण ४६ मिनिटं सर्व रक्ताच्या थारोळ्यात, रस्त्यावरच बेशुद्ध पडून होते. कारचा चालकही पळून गेला. जमली फक्त ५-६ लोकांची, बघ्यांची गर्दी!!

अधून-मधून कॅमेऱ्याचे फ्लॅश चमकत होते. कोणाच्या तरी मोबाइलमुळे दवाखान्याच्याच एक कर्मचाऱ्याच्या नजरेस ते अपघाताचे फोटो पडले आणि ४५ मिनिटांनंतर जखमी दवाखान्यात पोहचू शकले. पण सागर पुन्हा आमच्यापर्यंत पोहचू शकला नाही...

२६ वर्षाच्या कोवळ्या वयात, वयापेक्षा जास्त समजदार असलेला सागर सोडून गेला; खरं तर जावं लागलं हे म्हणणं जरा जास्त योग्य. आज त्याच्या नसण्याला, गाडीचा चालक जास्त जबाबदार होता की ती बघ्यांची गर्दी हे प्रश्न आहेतच.

समाजासाठी तळमळीनं काम करणारा, स्वप्न पाहणारा सागर असा अकाली गेला, आपल्या समाजाचंच हे एक मोठं नुकसान आहे.

*रोंगटे खडे हो जाते है मेरे,*
*जब मैं देखता हू खुले आसमां में,*
*तिरंगा शानसे लहरा रहा हैं,*
*मेरी आंखे भी व्यस्त किसी उडान में।*
*मुझे वक़्त कहा हैं नीचे देखने का?*

*मुझे अभिमान है मेरे देश का,*
*जिसने मुझे एक गौरवपूर्ण पहचान दी।*
*मुझे आसमान में उडने की आजादी थी,*
*पर... इनके भाग्य में क्यू बरबादी थी?*

*आजादी. .. जो मुझे सपने देखने की,*
*उन्हे साकार करने की इजाजत देती है।*
*पर वो मुझे क्यू नहीं सिखाती की,*
*देश की आधी आबादी भूखी सोती है?*

*आजादी, जो मुझे कामयाबी का जश्न*
*मनाने देती है ख़ुशी से,*
*फिर भी क्यू हमारे अन्नदाता-*
*खुद को समाप्त करते है- खुदखुशी से?*

*मेरे श्रेष्ठतम संविधान ने*
*सभी को एक समान आजादी का हक़ दिया है;*
*यह मैने स्कूल मे पढा था।*
*फिर क्यू एक तरफ़ आसमान को छूती इमारते,*
*और चांद पर बसते सैटेलाईट;*
*तो दुसरी तरफ गरिबी और अन्याय से दबे लोग,*
*सुलगता गुस्सा, और पनपते नक्सलाईट?*

*आजादी वो नहीं जो दुसरो का हक़ छिनकर*
*हमें औरोसे श्रेष्ठ दिखाती हैं।*
*आजादी वो है, जो हमें दुसरो की आजादी का भी*
*सम्मान करना सिखाती है।*

- ***सागर काबरा***

